

# श्रीमती लक्ष्मीबाई केळकर जन्मशताब्दी

नीला व प्रकाश वाघमारे

६ ऑगस्ट २००५ रोजी फ्लोरहॅम पार्क, न्यू जर्सी येथे एका शाळेच्या सभागृहात स्त्रियांच्या प्रश्नांवर महिला परिषद भरली होती. त्याचे आयोजन न्यूयॉर्क, न्यू जर्सी भागातील राष्ट्रीय सेविका समितीच्या (रा. से. स.) महिला कार्यकर्त्यांनी केले होते. मातृत्त्व, कतृत्त्व व नेतृत्त्व पूर्णत्त्वाला नेऊन श्रीमती लक्ष्मीबाई केळकर यांनी स्त्रियांच्या कल्याणासाठी राष्ट्रीय सेविका समितीची स्थापना केली आणि जगातील एक सर्वात मोठी स्त्री संघटना म्हणून नांवारूपास आणली. अशा अनन्यसाधारण कर्मयोगिनीची जन्मशताब्दी साजरी करण्याच्या उद्दिष्टाने ही परिषद भरविण्यात आली होती.



श्रीमती लक्ष्मीबाई केळकर यांचा जन्म ६ जुलै १९०५ रोजी नागपूर जवळील महाल या गावातील दाते कुटुंबात झाला. त्यांचे माहेरचे नांव होते कमल. लहानपणापासूनच घरातील धार्मिक पण सुधारक विचार आणि लो. टिळकांचे राष्ट्राभिमानी नेतृत्त्व कमलच्या मनावर बिंबले होते. त्यामुळे वयात येताच हुंडा न घेणाऱ्या पुरूषाशीच लग्न करण्याचा निश्चय पक्का झाला होता. सुदैवाने वर्ध्याच्या पुरूषोत्तम केळकर यांच्या रूपाने तसा जोडीदार १९१९ साली मिळाला. मात्र दुर्दैवाने वयाच्या अवघ्या २७व्या वर्षी ९ मुलांची जबाबदारी व वैधव्य पदरात पडले. तरिही खचून न जाता त्यांची दैवाशी झुंज येथून सुरू झाली आणि पुढील कार्याचा पाया तयार होण्यास सुरूवात झाली. ते दिवस स्त्रियांनी, विशेषतः विधवांनी, समाजाच्या द्रुष्टीस न पडता चार भिंतीआड गुजरण्याचे होते. परंतू तसे न करता शिक्षणाला उत्सुक असणाऱ्या त्यांच्या मुलींसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्यांनी वर्ध्याला मुलींची शाळा सुरू केली. लक्ष्मीबाईंनी त्यांच्या सारख्याच इतर स्त्रियांना एकत्र आणून त्यातील योग्य स्त्रियांवर शिक्षकाची जबाबदारी टाकली, प्रसंगी त्यांना आपल्या घरांत आश्रयही दिला.

त्या सुमारास हिंदु अस्मितेला जागृती देणाऱ्या डॉ. हेडगेवार यांच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने (आर. एस्. एस्.) लक्ष्मीबाईंना खूप प्रभावित केले होते. त्याने प्रेरित होऊन डॉ. हेडगेवार यांच्या मार्गदर्शनाखाली २५ ऑक्टोबर १९३६ रोजी विजयादशमीच्या मुहुर्तावर वर्ध्याला लक्ष्मीबाईंनी राष्ट्रीय सेविका समितीची स्थापना केली. राजमाता जिजाबाई, राणी लक्ष्मीबाई आणि अहिल्याबाई होळकर ही या समितीची स्फूर्तिस्थाने होती. लक्ष्मीबाईंना या संघटनेद्वारे स्त्रियांना त्यांच्यामधील सुप्तशक्तीची जाणीव करून देण्याबरोबरच चारित्र्यवान व राष्ट्राभिमानी समाज घडवायचा होता. समितीच्या प्रचारासाठी त्या सायकल आणि इंग्रजी शिकल्या. केवळ सहा वर्षात समितीच्या कार्याचा प्रसार महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर झाला. परप्रांतीय लोक त्यांना प्रेमाने 'मौसिजी' म्हणून संबोधू लागले. देशाच्या फाळणीचे वेळी पाकिस्तानात हत्याकांड चालू असताना १५ ऑगस्ट १९४७ रोजी त्यांनी कराचीला भेट देऊन १२०० सेविकांच्या उपस्थितीत जाहीर कार्यक्रम केला.



आज भारताबरोबरच इतर २१ देशांत (अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, केनया, मॉरिशस, ब्रह्मदेश, मलेशिया इ.) समितीचे ३००० हून अधिक सेवाप्रकल्प सुरू आहेत आणि त्यात लाखोवारी स्त्रिया कार्यरत आहेत. समितीतर्फे अनेक शहरात वैद्यकिय केंद्रे, वाचनालये, स्त्री शिक्षकांसाठी व परित्यक्ता स्त्रियांसाठी वसतीगृहे, हस्तकला केंद्रे, भजन-पूजा वर्ग, कौटुंबिक समस्या समूहपदेशक केंद्रे चालवली जातात व तेथील बहुतांशी मदत विनामूल्य असते. राष्ट्रीय सेविका समितीबद्दल बोलताना स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले होते, "समितीचे कार्य पावसाच्या रिमझिम सरींसारखे आहे, पावसाची जाणीव आपल्याला होत नाही पण शेतांतील पिकांना (समाजाला) तो उपयुक्त ठरतो. याउलट वादळी पाऊस, गडगडाटाने त्याची जाणीव होते पण त्याचे पाणी नुसतेच वाहून जाते."

फ्लोरहॅम पार्क, न्यू जर्सी प्रमाणे यंदा लक्ष्मीबाईंच्या जन्मशताब्दी निमित्त भारत व भारताबाहेर अनेक कार्यक्रम झाले. महाराष्ट्राचे नांव भारतातच नव्हे तर भारताबाहेरही उज्ज्वल करणाऱ्या या अलौकिक लाडक्या मावशीला आदरांजली वाहण्यास न्यू जर्सीत मराठी स्त्रियांची उपस्थिती अल्प होती ही खेदाची बाब आहे. एक सामान्य स्त्री तिच्या असामान्य कार्यामुळे हिंदु समाजात प्रभावी चमत्कार घडवून गेली. ते पाहून एक भारतीय म्हणून आपण सर्व नतमस्तक होऊ या !

नीला व प्रकाश वाघमारे
*waghmare2@cs.com*